**मुंबई नगर दिवाणी व सत्र न्यायालय, जुने सचिवालय आवार, फोर्ट, मुंबई— ४०० ०३२.**

**email: ctcourt-mum@nic.in**

**फोन नं. ०२२—२२८४ ४१३४**


# जाहीर सूचना

मा. संगणक समिती, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई, यांचे आदेशानुसार या कार्यालयाच्या आस्थापनेसाठी ०६ नग बायोमॅट्रीक मशीन ( फेस स्कॅन आणि फिगंर स्कॅन सहीत ) स्वारस्य असलेल्या संबंधित पुरवठादार/ उत्पादकांकडून खुल्या बाजारातून दरपत्रकाद्वारे खरेदी करण्यात येणार आहेत.

**सदर मशीन्स हया खालील तपशील नुसार खरेदी करण्यात येणार आहे.**

**१ ) फिगंरप्रिट स्कॅन क्षमता किमान ५००० कर्मचारी.**

**२ ) फेस स्कॅन क्षमता किमान ३००० कर्मचारी.**

**३ ) ट्रान्झॅक्शन क्षमता किमान ०२ लाख.**

**४ ) फेस स्कॅन आणि फिगंर स्कॅन रेकग्निशन ( Recognition ) गती < 1 second**

**५ ) सदर मशीनची निविदा हि इन्स्टॉलेशन आणि सॉफ्टवेअर खर्चासह ( Installation charges Including software ) देण्यात यावी .**

**६ ) सदर मशीनच्या वॉरंटीमध्ये कोणत्या बाबीं समाविष्ट आहेत हे निविदा सोबत जोडण्यात यावा.**

**७ ) निविदा सोबत सदर मशीन्सचा तपशील जोडण्यात यावा.**

तरी स्वारस्य असलेल्या संबंधित पुरवठादार/उत्पादकांनी खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून खरेदी प्रक्रियेत भाग घ्यावा:—

| | |
|---|---|
| १. | पुरवठादार/उत्पादकाने पूर्वी शासन स्तरावरच्या अशाप्रकारच्या खरेदी प्रक्रियेत सहभाग घेतलेला असावा. |
| २. | खरेदी दरपत्रक सोबत जोडलेल्या नमुना प्रपत्रात मोहोरबंद लिफाफ्यामध्ये सादर करावे. मोहोरबंद लिफाफ्यामध्ये नमुना प्रपत्राप्रमाणे नसलेले खरेदी |

| | |
|---|---|
| | दरपत्रक अपात्र ठरविण्यात येईल. |
| ३. | मोहोरबंद लिफाफ्यातील खरेदी दरपत्रक प्रस्तुत जाहीर सूचना प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ( दिनांक १०.०९.२०२५ ते १८.०९.२०२५) सार्वजनिक सुटटीवगळता, हमदस्त (By Hand) अथवा टपालाद्वारे (By Post/RPAD/Speed Post etc) प्रबंधक, नगर दिवाणी न्यायालय, जुने सचिवालय आवार, मुंबई–४०० ०३२ या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० दरम्यान पोहोच होतील याची दक्षता घ्यावी. उपरोक्त मुदती पश्चात प्राप्त मोहोरबंद लिफाफ्यांचा पुढील प्रक्रियेसाठी विचार करण्यात येणार नाही अथवा अपात्र ठरविण्यात येतील. |
| ४. | मोहोरबंद लिफाफ्यावर **" बायोमॅट्रीक मशीन खरेदीकरीता दरपत्रक निविदा"** असे स्पष्ट लिहावे. स्पष्ट उल्लेख नसलेले मोहोरबंद लिफाफ्यांचा पुढील प्रक्रियेसाठी विचार करण्यात येणार नाही. |
| ५. | उपरोक्त परिच्छेद ३ प्रमाणे विहित मुदतीत प्राप्त झालेले मोहोरबंद लिफाफे दिनांक २०.०९.२०२५ रोजी दुपारी २:१५ वाजता न्यायालय क्र. ४५ मा. न्यायाधीशांचे कक्ष, दूसरा मजला, नवीन इमारत, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई–४०० ०३२, येथे उघडण्यात येतील. केवळ पात्र निविदाकारांनी सादर केलेल्या किंमतीचे खरेदी दरपत्रक विचारात घेण्यात येतील आणि खरेदीचा निर्णय न्युनतम–१ (L-1)च्या आधारे घेण्यात येईल. |
| ६. | मोहोरबंद लिफाफे उघडण्याच्या दिवशी व वेळी संबंधित पुरवठादार/ उत्पादकांचे अधिकृत प्रतिनिधीनी उपस्थित रहावे. ज्या पुरवठादार/उत्पादकांचे अधिकृत प्रतिनिधी वरील दिवशी व वेळी उपस्थित राहणार नाहीत त्यांची कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |
| ७. | पुरवठादार/उत्पादक या व्यक्ती किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा–या अन्य व्यक्ती/संस्थेमध्ये थेट स्वारस्य असता कामा नये आणि असे स्वारस्य दिसून आल्यास त्यास 'हितसंबंधाचा संघर्ष' समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकारण्यात येतील. |

| | |
|---|---|
| ८. | कमीत कमी तीन वेगवेगळया पुरवठादार/उत्पादकांकडून मोहोरबंद लिफाफ्यात दरपत्रक प्राप्त न झाल्यास सदर प्रक्रियेला एका आठवडयाची मुदतवाढ देण्यात येईल आणि मुदतवाढीत आवश्यक दरपत्रके प्राप्त न झाल्यास प्रक्रिया पुन्हा नव्याने राबविण्यात येईल. |
| ९. | उपरोक्त बायोमॅट्रीक मशीन खरेदीसंदर्भात या कार्यालयाने निर्धारित केलेल्या वित्तीय अंदाजपत्रकास अनुसरून, प्रत्यक्ष खरेदी कमी/जास्त प्रमाणात करण्यात येईल आणि त्यासंबंधी पुरवठादार/उत्पादकास कोणताही आक्षेप राहणार नाही. |
| १०. | अंतिम निवड झालेला पुरवठादार/उत्पादक खरेदी आदेशात नमूद बायोमॅट्रीक मशीन, मा. प्रबंधक, नगर दिवाणी न्यायालय, जुने सचिवालय आवार, मुंबई—४०० ०३२ येथे त्यासंबंधीतचा आदेश प्राप्त झाल्यापासून **इन्स्टॉलेशन आणि सॉफ्टवेअर खर्चासह** त्वरीत व जाहिर सूचनेतील तपशिलाप्रमाणे पुरवठा करणेस बंधनकारक असेल आणि त्या पुरवठाकामी होणारा कोणताही वाहतूक अथवा हमाली खर्च/शुल्क या कार्यालयाद्वारे अदा केले जाणार नाही. |
| ११. | देयक रक्कम प्रदान करतेवेळी कोणतेही अतिरिक्त शुल्क/विलंब आकार अदा केले जाणार नाही. |
| १२. | खरेदी आदेशात नमूद बायोमॅट्रीक मशीन्स यांचा पुरवठा जाहिर सूचनेतील तपशिलाप्रमाणे नसल्यास अथवा खराब असल्यास, पुरवठादार/उत्पादक स्व:खर्चाने बदलून पुरवठा करावा लागेल. |
| १३. | वरील खरेदी प्रक्रियेचे सर्व अधिकार मा. संगणक समितीकडे राहतील. |

ठिकाण: मुंबई

सही/—

प्रभारी प्रबंधक,

नगर दिवाणी न्यायालय, मुंबई.

दिनांक: १०/०९/२०२५.

## नमुना दरपत्रक प्रपत्र ( SPECIMEN)

| | | |
|---|---|---|
| कामाचे नाव | : | ०६ नग बायोमॅट्रीक मशीन ( इन्स्टॉलेशन आणि सॉफ्टवेअर खर्चासह ) खरेदी करण्याबाबत. |
| पुरवठादार/उत्पादकच्या संस्थेचे/कंपनीचे नाव | : | |
| पुरवठादार/उत्पादकच्या संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण पत्ता | : | |
| पुरवठादार/उत्पादकच्या संस्थेचा/कंपनीचा संपर्क दूरध्वनी | : | |
| पुरवठादार/उत्पादकच्या संस्थेचा/कंपनीचा नोंदणी क्रमांक | : | |
| पुरवठादार/उत्पादकच्या संस्थेचा/कंपनीचा सेवा कर क्रमांक | : | |

| अ. क्र | बायोमॅट्रीक मशीन तपशील | मागणी करण्यात आलेल्या एका वस्तूची किंमत (रुपये) | एकूण वस्तू व सेवा कर (रुपये) | मागणी करण्यात आलेल्या एका वस्तूची किंमत करासहित (रुपये) (स्तंभ ३+४) | मागणी करण्यात आलेल्या वस्तूची एकूण संख्या | एकूण रक्कम वस्तू व सेवा करासहित (रुपये) (स्तंभ ५ X ६) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १ | ब्रॅन्डचे नाव :<br><br>मॉडेल नं : | | | | ०६ नग | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| २ | इन्स्टॉलेशन खर्च<br>( सॉफ्टवेअर सहीत ) | | | | ०६ नग | |
| **एकूण** | | | | | | |

**एकूण रक्कम रू.............**
**—(अक्षरी रूपये.......................................................................)**

(पुरवठादार/उत्पादकाचे नाव, सही, शिक्का, दिनांक)

**टिपः— स्तंभ क. २,३, ४,५ व ७ मधील माहिती कंत्राटदारांनी भरावयाची आहे.**